# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, जुना पुणे - बेंगलोर महामार्ग, कृषी महाविद्यालयासमोर, कोल्हापूर – ४१६००४

दुरध्वनी क्र. (०२३१)२५२१०३८ फॅक्स क्र. २५२१०१६ gpkolhapur@yahoo.com


जा. क्र./ दिनांक :

**कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचे उपक्रम अंतर्गत**

## दिव्यांग ( अपंग ) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष २०१८-१९ अभियांत्रिकी पदविका प्रवेश

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य - ०५, यंत्र - ०५, विद्युत - ०५, औ.अणुविद्युत - ०५, माहिती तंत्रज्ञान - ०५ अशा एकूण २५ जागेसाठी इयत्ता १० वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. सदरहू प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यास एस.एस.सी. परिक्षेत किमान ३५% गुण आवश्यक आहेत. एस.एस.सी. परिक्षा गणित (सांकेतिक क्र. - ०७१ - बिजगणित व भूमिती ), सामान्य विज्ञान( सांकेतिक क्र. - ०७२ ) व इंग्लिश या विषयामध्ये उत्तीर्ण असणे तसेच किमान ४०% दिव्यांग (अपंग) असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश नियमावली प्रमाणे व संस्थेमध्ये व्ही. आर. सी. मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणा-या वैद्यकिय चाचणीनुसार देण्यात येईल. या योजने अंतर्गत प्रवेशार्थीस शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह, भोजन भत्ता, पुस्तके व स्टेशनरी साठी भत्ता इत्यादी सोयी सवलती केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठी असणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठी ( Online Registration ) अर्ज दि. १६/०७/२०१८ पर्यंत करावा. सुविधा केंद्राकडुन ( Facilitation center ) देण्यात येणा-या पोचपावतीची दुय्यम प्रत व हस्तलिखित अर्ज आपल्या दुरध्वनी क्रमांकासह प्रत्यक्ष अथवा पोस्टाने उशिरात उशिरा दि. २०-०७-२०१८ पर्यंत शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे सादर करावा. **या संस्थेमधे असे अर्ज प्राप्त झालेले इच्छुक दिव्यांग (अपंग) विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र राहतील.** या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय चाचणी व प्रथम फेरी प्रवेश प्रक्रियेसाठी दि. ३०/०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेत मुळ कागदपत्रे व इतर शुल्क (अंदाजे रू. ३०००) सह उपस्थित रहावे.

टिप - या योजनेअंतर्गत उपलब्ध जागांसाठी प्रवेश प्रक्रिया दि. २७/०८/२०१८ पर्यंत चालू राहणार आहे.
त्याप्रमाणे इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांनी संस्थेमध्ये संपर्क साधावा.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर